# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
## Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½ ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


### अधिष्ठाता, (Dean)शासकीय वैदयकीय महाविदयालय, महाराष्ट्र वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, गट-अ

**धारिका क्रमांक :११६५/५१२०/१५८९/दहा** **जाहिरात क्रमांक : १३५/२०१५**

आयोगामार्फत महाराष्ट्र शासनाच्या आस्थापनेवरील **अधिष्ठाता, (Dean)शासकीय वैदयकीय महाविदयालय,महाराष्ट्र वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग, गट-अ** च्या एकूण **दोन** पदासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदांसाठी खालील अटी व अर्हतांची पूर्तता करणारे उमेदवार अर्ज करू शकतात.

**२. उपलब्ध पदसंख्या :- २**

| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | एकूण मागासवर्गीय | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १* | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | २ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक /समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| अ) महिला (३०%) | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | १ |
| ब) खेळाडू (५%) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| क) अपंग (३%) | -- | | | | | | | | | | |

(* उपलब्ध असल्यास महिलासाठी आरक्षित)

**२.१** वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबधित विभागाच्या सुचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**२.२** विचाराधीन पदाकरिता अपंगांसाठी पद राखीव नसले तरी शासन निर्णय क्र. एमईएस/१२०२/(८१)/वैसेवा-१, दिनांक १९ ऑगस्ट, २००५ नुसार तसेच शासन निर्णय क्र. न्यायाप्र/२००९/प्र.क्र.९/सुधार -३ दिनांक १३ ऑगस्ट, २००९ च्या अनुषंगाने १) श्रवण शक्तीतील दोष (hearing impairment) २)चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू (Locomotor Disability or Cerebral Palsy) या अपंग प्रवर्गातील उमेदवार प्रस्तुत पदासाठी अर्ज करु शकतात.

**३. वेतनश्रेणी :** रु.३७,४००-६७,०००+ (ग्रेड पे रु. १०,०००/- ) अधिक इतर भत्ते

**४. पात्रता- उमेदवार भारतीय नागरिक असावा.**

**४.१** वय- **दिनांक १ फेब्रुवारी, २०१६ रोजी अमागास वर्गवारीकरिता ४५ वर्षापेक्षा व मागासवर्गवारीकरिता ५० वर्षापेक्षा जास्त नसावे.**

**४.२** महाराष्ट्र शासनाच्या कर्मचा-यांना उच्च वयोमर्यादा लागू नाही.

**४.३** अपवादात्मक शैक्षणिक अर्हता किंवा अनुभव किंवा दोन्ही धारण करणा-या उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा शिथिल करण्याविषयी आयोग विचार करु शकेल. परंतु आयोगाच्या कार्यनियमावलीतील प्रमाणानुसार जेव्हा मुलाखतीसाठी पुरेसे उमेदवार प्राप्त होत नसतील तेव्हाच हा नियम विचारात घेतला जाईल. अशा प्रत्येक प्रकरणी उपलब्ध उमेदवारांच्या उच्चतम शैक्षणिक अर्हतेच्या दोन स्तर उच्च शैक्षणिक अर्हता प्राप्त उमेदवारच वयोमर्यादेत सवलतीकरीता विचारात घेतले जातील. अनुभवाच्या संदर्भात ज्या पदावरील किमान अनुभव मागितला असेल त्यापेक्षा वरीष्ठ पदावरील अनुभव वयोमर्यादा शिथिलीकरणास्तव विचारात घेतला जाईल.

४.४ शैक्षणिक अर्हता:- possess M.B.B.S. degree and post graduate degree in any branch of medical science or a qualification recognized as equivalent to a post graduate degree by the Medical Council of India, Constituted under the Indian Medical Council Act 1956 (102 of 1956). **AND**

४.५ **अनुभव :-** Ten years experience of teaching in a post not below the rank of Associate Professor or Reader in a Medical College out of which atleast five years experience should be in the post of Professor in a Medical College Or Medical Research Institute after obtaining qualification mentioned in 4.4 above

४.६ Preference will be given to candidates having experience of research work in their relevant subject and to those who have published original research work in the relevant subject in a recognized Medical Journal (Work accepted for publication will be regarded as evidence.)(सर्वसाधारण सूचनासाठी परिशिष्ट ' अ' पहावे)

५. प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अर्हता किमान असून किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरिता पात्र असणार नाही. जाहिरातीस अनुसरून प्राप्त झालेल्या अर्जाची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टीने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव यापेक्षा जादा शैक्षणिक अर्हता/अनुभव यांच्या किंवा अन्य योग्य निकषा आधारे निकष निश्चित करून अथवा **चाळणी परीक्षेद्वारे** मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, अर्हता आणि / अथवा अनुभव शिथिल केला जाणार नाही. चाळणी परिक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येतील.

६. जे उमेदवार चुकीची माहिती सादर करतील त्यांना या व पुढील सर्व निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.

७. कर्तव्ये व जबाबदाऱ्या - प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या याबाबतचा तपशील आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**८. शुल्क :**

**८.१) अमागास ५२०/- ८.२) मागासवर्गीय- रु.३२०/-**

**९. अर्ज करण्याची पध्दत -**

९.१ प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

९.२ पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज https://mahampsc.mahaonline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक २३ ऑक्टोबर, २०१५ ते दिनांक १३ नोव्हेंबर, २०१५** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

९.३ ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in तसेच www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

९.४ विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

९.५ आयोगाने निश्चित केलेला परीक्षा शुल्क खालील पद्धतीने भरता येईल :-
(१)भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे (२)नेटबँकिंग (३)डेबीट कार्ड (४)क्रेडिट कार्ड (५)संग्राम केंद्र/सीएससी (नागरीक सेवा केंद्र)

९.६ https://mahampsc.mahaonline.gov.in येथे संग्राम केंद्र (ग्रामपंचायतीमध्ये) आणि सीएससी ची सूची उपलब्ध आहे.

९.७ परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा.

(१) शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील "माझे खाते" या लिंक वर क्लिक करावे.

(२) "माझे खाते" या लिंक वर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह सेल. ज्या पदासमोर 'Unpaid' असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी "Pay Now" अशी लिंक उपलब्ध असेल.

(३) 'Pay Now' या लिंक वर क्लिक केल्यानंतर ३ पर्याय उपलब्ध होतील.
(१) ऑनलाईन पेमेंट (२) नागरी सुविधा केंद्र (३) चलनाद्वारे

(४) उमेदवार क्रेडिट कार्ड, डेबीट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईल पेमेंट करु शकतील.

(५) नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणाऱ्या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. उपरोक्त कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहिल.

(६) उमेदवाराने चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणाऱ्या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

(७) ज्या उमेदवारांना भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावयाचे आहे असे उमेदवारा अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

**१०.** चाळणी परीक्षा घ्यावयाचे ठरल्यास सदर परीक्षेच्या अर्ज स्वीकारण्याच्या अतिम दिनांकानंतर व परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेशप्रमाणपत्र त्याच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमेदवाराने परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.
**११.** परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.
**१२.** चाळणी परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांना मुलाखतीचे वेळी सर्व मूळ प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. अन्यथा मुलाखत घेतली जाणार नाही.
**१३.** चाळणी परीक्षा घेतल्यास चाळणी परीक्षेचे व मुलाखतीचे गुण मिळून उमेदवाराची शिफारस करण्यात येईल.
**१४.** विहित पद्धतीने अर्ज सादर करून शुल्क भरण्याची, तसेच स्टेट बँकेमध्ये परीक्षा शुल्क भरण्याकरिता चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही **दिनांक १३ नोव्हेंबर, २०१५ रोजी २३.५९ वाजेपर्यंत** पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.
**१५.** चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये **दिनांक १६ नोव्हेंबर, २०१५** पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : २३/१०/२०१५**

**श्री.शं.पाठक**
**उपसचिव**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग.**